**नियमित दिवाणी मुकदमा क्र. १६५/२०१२**
**निशाणी क्र. ११४ खालील आदेश**
**सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय.०६–०००४५३–२०१२**

१. प्रतिवादी क्र.१ ने या अर्जाद्वारे जादा पुरावा देण्याची परवानगी मागितली आहे. त्यांचे असे कथन आहे की, या दाव्याच्या कामी अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर वादीने साक्षीदार तपासून जादा पुरावा दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ला जादा पुरावा देणे आवश्यक झाले आहे. याकामी जरी प्रतिवादी क्र. १ चा पुरावा बंद झाला असला तरी देखील वादीच्या जादा पुराव्यामुळे त्यास गुणदोषावर बाजू मांडण्याकरीता जादा पुरावा देण्याची संधी देण्याची विनंती केली आहे.

२. वादीने नि.११६ वर म्हणणे दाखल करुन अर्जातील मागणीस हरकत घेतली आहे. त्यांनी अंतिम युक्तीवादानंतर त्यांच्यातर्फे साक्षीदार तपासून जादा पुरावा दाखल केलेचे मान्य केले आहे. परंतु त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ला देखील जादा पुरावा देणे आवश्यक असल्याचे मात्र नाकारले आहे. प्रतिवादी क्र.१ चा वादीने उलटतपास घेतल्यानंतर त्यांनी लेखी पुरशिसद्वारे त्यांचा पुरावा बंद केलेला असल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व वादीतर्फे विधिज्ञ पुकारता गैरहजर. सबब त्यांचेकरीता युक्तीवाद नाही. दाव्याचे अभिलेखाचे अवलोकन केले.

४. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीबाबत सरस–निरस मानाने धडेवाटप होवून पृथककब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतचा दावा दि.१४/१२/२०१७ रोजी अंतिम युक्तीवादाकरीता नेमलेला असताना नि.७४ वर वादीने कागदपत्र दाखल केले आणि त्यानंतर नि.७६ वर कागदपत्र दाखल केले होते. त्यानंतर दि.२२/०१/२०१८ रोजी वादीने नि.७९ वर अर्ज दाखल करुन साक्षीदार क्र.३ यांना साक्षीसमन्स पाठविणेची विनंती केली होती. त्यानुसार पुढे वादीतर्फे सा.क्र.३ यांचा पुरावा सादर झाला आहे आणि ही बाब वादीला देखील मान्य आहे. वादीतर्फे अंतिम युक्तीवादानंतर जादा पुरावा दाखल झाल्यामुळे न्यायाचे कारणास्तव प्रतिवादी क्र.

१ ला देखील त्याची बाजू मांडण्याकरीता जादा पुरावा दाखल करण्याची संधी देणे न्यायोचित आहे. तसे झालेस दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादी क्र. १ ने जादा पुरावा म्हणून या अर्जासोबत सा.क्र.२ यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. वादीला प्रतिवादी क्र. १ तर्फे सा.क्र.२ यांचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध असल्यामुळे वादीचे नुकसान होण्याचे कारण नाही. सद्य परिस्थितीमध्ये अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे या निष्कर्षापर्यंत येत असून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. प्रतिवादी क्र. १ चा नि.११४ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने दाखल केलेल्या जादा पुराव्याच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचा जादा पुरावा दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

RUPALI RAJANIKANT BEDAGKAR

Digitally signed by RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Date: 2022.11.05 16:56:00 +0530

(श्रीमती आर.आर.बेडगकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.

दिनांकः–०५/११/२०२२